# महेश सहकारी बँक लि.,पुणे

मुख्यकार्यालय: ३७२/७३/७४, श्री छत्रपती शिवाजी मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-४११ ०३७.

दूरध्वनी क्रमांक : २४२६३३४१/४२/४३

Website: www.maheshbankpune.in E-mail: msbl@maheshbankpune.in


## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

### फक्त सभासदांसाठी

महेश सहकारी बँक लि.,पुणे या बँकेची **४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा** रविवार, **दि.०८.०९.२०१९** रोजी सकाळी १०.३० वाजता **महेश सांस्कृतीक भवन, स.नं.६२/२ बी, कोंढवा पुणे-४११०४८** येथे खालील विषयांवर कामकाज करण्यासाठी भरणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

१. मागील वर्षी दिनांक ०२.०९.२०१८ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.

२. संचालक मंडळाच्या बँकेच्या कार्याबद्दलचा वर्षअखेरच्या अहवाल व लेखापरिक्षण झालेल्या दिनांक ३१ मार्च २०१९ अखेर संपलेल्या वर्षाचे नफातोटा पत्रक व ताळेबंद स्वीकृत करणे.

३. सन २०१८-१९ साठीच्या मा.संचालक मंडळाने कायदा, नियम व उपविधी यास अनुसरून शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजूरी देणे.

४. सन २०१८-१९ चा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल व सन २०१७-१८ चे वैधानिक लेखापरिक्षण दोषदुरूस्ती अहवालाची नोंद घेऊन स्वीकृत करणे.

५. सन २०१९-२० करीता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकाची आणि प्रगतीच्या तक्त्याची माहिती घेणे.

६. सन २०१८-१९ या सालासाठी मागील वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मा.वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्ती व मानधन ठरविणे याबाबतचे निर्णयानुसार मा.संचालक मंडळाने केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणे.

७. सन २०१९-२० करीता मा.वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

८. बँकेच्या पोटनियमांमध्ये सुचविलेल्या दुरूस्त्यांना मान्यता देणे.

९. सेवकांची रचना व नेमणुकीस मान्यता देणे.

१०. दिनांक ३१.०३.२०१९ अखेर संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.

११. महाराष्ट्र शासनाच्या नागरी सहकारी बँकांसाठी एकरकमी कर्ज परतफेड योजना, शासन निर्णयानुसार दि.३१.०३.२०१९ पर्यंत तडजोड केलेल्या थकित कर्ज खात्यांच्या माहितीची नोंद घेणे.

१२. अहवाल वर्षात सहकार खात्याने मागविलेल्या माहितीची नोंद घेणे.

१३. सन २०१९-२० करीता बँकेच्या सभासदांचे शिक्षण व प्रशिक्षणाचे संदर्भात चर्चा करणे.

१४. ४७ व्या सर्वसाधारण सभेस उपस्थित नसलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापीत करणे.

१५. मा. संचालक मंडळाचे आगामी निवडणूकीबाबत माहिती घेऊन नोंद घेणे.

१६. मा.अध्यक्षांचे पूर्वपरवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार विनिमय करणे.

**मा.संचालक मंडळाच्या आज्ञेवरून,**

**(एस.आर.करवा)**
**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**

स्थळ: पुणे
दिनांक: २९.०७.२०१९

**सूचना:**

१) गणसंख्ये अभावी (कोरम किमान २००) सभा तहकूब झाल्यास सदरची सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेच्या अर्धा तासानंतर घेण्यांत येईल व अशा सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

२) बँकेचे लेखापरिक्षित नफा-तोटा पत्रक, ताळेबंद व संचालक मंडळाचा अहवाल बँकेचे मुख्यकार्यालय व सर्व शाखा कार्यालयामध्ये उपलब्ध आहे, तो सभासदांनी सदर कार्यालयांतून पोहोच देऊन घ्यावा अथवा आपणांस तो पोस्टाने हवा असल्यास तसे मागणीचे लेखी पत्र मुख्यकचेरीस पाठवावे. त्यानुसार सभासदाचे बँकेत नोंदविलेल्या पत्त्यावर अहवाल पाठविला जाईल.

३) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वरिल नोटीस बाबत अधिक स्पष्टीकरण हवे असल्यास तसे पत्र दिनांक ३१.०८.२०१९ पूर्वी बँकेच्या मुख्यकार्यालयाकडे कार्यालयीन कामकाजाचे वेळेत पाठवावे.

४) सभासदांना उपस्थितीचा दाखला देण्याची व्यवस्था सभेच्या वेळी करण्यात येत असुन सदर दाखला घेऊन जाणे आवश्यक आहे. तो आपल्या क्रियाशील सभासदत्वाचा एक पुरावा म्हणून ग्राह्य धरला जाईल तो जपून ठेवावा.